वीरांचं. त्यांचे त्यांना प्रकाश सतत देवत ठेवला, स्वतःभोवतीचा अंधकार दूर केला, पैठल्या प्राण्यां- ना मांस आणि कंदमुळं त्यावर भाजायला शिकवला, एरवी नव्हे तर त्याचा भयानक वणव्यानं जंग- लच्या तो आगी लागत सुटला. क्षणार्धात विस्तारे कितीतरी भूमि या आगीत अडकून मोकळा होता मक्ला दिसू लागले. असं जंगल जळलं की तिथं मोकळं स्थान तयार होई. ईश्वर उतरल्यावर तिथं उगवलेल्या गवतावर भी ही गवतं त्यावर धरून जगावयाचं. जंगलातून हिंडणाऱ्या प्राण्यांना हा मोकळा भाग आवडायला लागे. तिथं ही गवतं खात धरून फिरत आणि त्यांना (हाकून) मारीत किंवा शिकार करण्याच्या हेतूने नेत आणि खाली उडी घ्यायला लावून त्यांना पोटासाठी मारीत. या आगीमुळे जंगल, डोंगर असे विविध भाग तयार होत. प्रत्येक भागात- ल्या हे उघड, आगमनाचे भोवरा म्हणजे माझं देवत होत. त्यांच्या पाठोपाठ, सूर्यप्रकाश पडला की गवताची उगवण झाली. हे माझं अंधार मार्गातले दिवस नव्हे. हे भोवरा या विविध वनस्पतींना जीवन देणारा होता. त्यांत पशुपक्षी नांदून केव्हाच आपलं करीत. झुडुपांना फुलं, फळं आली की सुंदर पक्षी त्यावर उडून पडत, त्यांच्याबरोबर कीटक आणि मी इथे तिथे फिरत असे. हे भोवरा होते, नव्हे होते, त्यांचे वृक्षांवर त्याही अंधारात टोकं बसावी. त्यांच्याही तिथं करत राहणारे, मांसाहारी पोटासाठी राहणारे प्राणीही उपकारावर आहे. त्यांच्यावर त्यांनी घर मांडून ठेवी. वृक्ष-वनस्पतींनी तयार केलेली माती सुपीक होती आणि त्यातल्या भागावर उन्हाळे पडले तरी भरून येत असे, पोटाचं शरीर आपलं झाकलं जात असे.

आता वाटून, जंगल जाळून (एकदाचा) असा भाग साफ केला की माणूस तिथली कंदमुळं, प्राणी, पक्षी यांच्यासमवेत तिथं राही आणि मग आपला होई. दुसरीकडे आग लावायचा. मग त्या भागावर प्रथम थोडं गवत उगवे, मग तण, झुडुपं असं भरीत आणि काही काळानं झुडुपी जंगल माझं तयार होत असे. मग तिथे पुन्हा वनराई, म्हणजे वृक्षांनी भरलेलं जंगल आणि सुंदर स्वरूप येई, सगळं बदलून हे सुंदर जंगल जाळायलाही माणूस येतो की काय, अशी मला सतत भीती वाटे. पण माणूस तो इकडे फिरकत नसे. त्याला इतर कितीतरी जंगलातील कोरड्या मातीत अंधारात जगता येत होतं. त्याचे गावामध्ये माणसाचा आधार जगत असावे लागत असेल.

एकदा असं झालं, माणूस एक जंगलाला उगाच जाळून जो निघून गेला, तो पुन्हा इकडे फिरकलाच नाही. कितीतरी काळ लोटला, सुंदरशा जंगलाचं घनदाट जंगलात आणि नंतर कोमल अशा झाडांत वनस्पतीत रूपांतर झालं. त्यातून काही वृक्ष सरसर वाढत आकाशाला भिडू लागले. मला पुन्हा खूप, डेरेदार वृक्षांनी सावलं पडू लागली. गारठा, पाचोळ्यांनी जमीन भरू लागली. सूर्यप्रकाश त्यांना पोचेना झाला, असं वाटू लागलं.

पण नाही! एक दिवस माणसांनी एक मोठी टोळीच एकाएकी आत घुसत आली. आता त्यांच्याजवळ धारदार, चकचकीत शस्त्रं होती. त्याने घाव घालून त्यांनी वृक्षतोड सुरू केली. मुळापासून वृक्ष उपटले गेले. आगीपेक्षाही ही फार भयानक होती. वृक्ष उन्मळून पडले आणि मग या विध्वंसकांनी त्यांच्यावर आगीनंही प्रयोग केला. रखरखीत जमिनीचे सगळं झालं. आणखी काही काळ हे विध्वंसक तिथेच थांबले. जंगलात जाणारे लाकूड तोडून आणून त्यांनी लाकडं जमीनदोस्त करून त्यांनी त्यांत घर बांधलं आणि जमिनीवर नांगर फिरवून वेगवेगळी पिकं घ्यायला सुरुवात केली. दरवर्षी पिकांची ही तणं जंगलात घुसू लागली, झाडं-झुडुपं नाहीशी होऊ लागली. मोकळ्या भागात उगवलेल्या गवतावर त्यांनी गुरं चरण्यास सोडलं. मग आणखी वाढलं. एका जागी स्थिर राहणारा माणूस मी प्रथमच पाहत होतो. सकाळचा काळ उजाडला, तरुणपणी मला जाणवलं की माणूस हा आता इथंच राहणार, हे जंगल, हा डोंगर माझंच म्हणणार, सृष्टीने मला दिलेल्या कोणत्या धनाला उपयोग स्वतःसाठी करत राहणार, इतर कोणालाही त्यात वाटेकरी होऊ देणार नाही. इतरांच्या असोशीसाठी माझं खाण्यात

आजपर्यंत सूक्ष्मजीवांना हेतु नसी ओळखता येत? मला उमगेना. पण झाडांनी ही जरुरी निसर्गाने महत्त्व जाणले, राहत असले, अहिंसाम यांच्या प्रांत आज होते?

माणसं स्थिरावली, त्यांनी जनावरं जंगलातल्या जनावरांना वेढला घास काढून नेऊ लागली, आणि जमीन घेर म्हणून माणसानं रानजनावरांपासून रक्षण केलं नी नंतर शेती करायला सुरुवात केली. त्यासाठी आपापली जंगल काढून, जाळून जमीन मोकळी केली होती. त्यासाठी जंगलाची घडामोड ही सगळं ईमान होतो, पण आपल्या पुढीला उपयोग तो माझी संपत्ती निर्माण करण्यासाठी करीत असं मला वाटत नाही. ती वाटाविण्यासाठी राखण्यासाठीही जो काही करीत असी अपेक्षा मी व्यक्त करत होतो; तरीही तर सुमानाला जाते होतं. काही सहा माजला कोठे ठिकाणी जंगलांचे तुकडे त्याने राखून ठेवले, त्याचे झाड त्यामुळे न लागले. त्यांच्या देवराईत पाणी मिळालं.

माणसं माझ्या आजूबाजू आपापली राहू लागली तरी त्याच्या असलेल्या परिणाम आम्हा सर्वांना जाणवू लागले – मला, माझ्या वनस्पती, कीटक, पक्षी-प्राणी मित्रांना. तसं म्हटलं तर मानव मेघ टाकत नव्हता. सतत जगामधील तो घडामोड घडीत होता. पण त्याची सृष्टी नतिमानापर्यंत मर्यादित होती. भविष्यात दूरवर पहायची त्याला गरज वाटत नव्हती. त्याच्या मते सृष्टीचं धन अपरंपार होतं. त्याला रक्षणासाठी, पुढच्यांसाठी काही काम करायची गरज नव्हती. त्यानं जनावरांसाठी, शेतीसाठी आपण केलेल्या जमिनीवरची माती वाहून जाऊ लागली. काही भाग साफ उजाड गवत उगवलं, त्यात निरनिराळ्या कीटकांनी वस्ती केली, जमीन पुन्हा सुपीक केली, कारण गवत वनस्पतींना परागवहनास मदत मिळाली. जोरधार पर्जन्यामुळे, त्यामुळे वनस्पतींना पाणी मिळाला, पावसात गवत मरून जायची. त्यांनी उगवलेल्या गवतावर आपण ताण घातला. त्यावर मेंढ्यांपासून तो कुरतडलं गेलं. त्यांनी करणं गेलं नाही, कांद्यांनी मरायचं नाही. दर पावसाळ्यानंतर ही क्रिया चालू राहिली आणि उजाड गवताची पैदास होऊ लागली. त्याची जागा कोरडी, विजूठ गवताने घेतली. उजाड गवत गेलं, तसे त्यावरचे कीटक गेले. त्याबरोबर पक्षी गेले. परागवहन थांबत गेलं, मग वनस्पती दर पावसाळ्यानंतर खुरटल्यात, मंदावल्यात; काही झाडं पावसाळ्याआड मरू लागली, काही तीन तीन चार चार पावसाळ्यांनंतर पुष्पमंजिऱ्यांनी बहरली. मुसळी अनिश्चित चरई भरून राहिली. त्याबरोबर विजूठ गवताची वाढ होऊ लागली. त्यांनी जागा घेतली. दर पावसाळ्यात अंकुरणाऱ्या रंगांची सुंदर फुले असल्याने कीटकांना भुलवू लागली. आकर्षक रंगीबेरंगी फुलांनी गालिचा पसरलेले डोंगर पाहून माणसं सुखावली, पण काही मोजकेच कीटक तिकडे आकर्षिले गेले – होल, भुंग, माशा. पण अनेक प्रकारच्या कीटकांनी हे फूल तोंडही फिरविले नाही. कीटक-पक्ष्यांविना वनस्पतीही उदास झाल्या.

जगण्यासाठीही माणूस जंगलावर बऱ्याचशा अवलंबून होता. त्याला घरासाठी लाकडं, शेतीसाठी, सरपणासाठी लाकूड लागे. फळंफुलं, पानं, फुले, मुळ्या, औषधांसाठी लागत. कोणी सांगेली, बेसुमार झाडं तोडू लागली. पावसाळ्यात होणारी पुनर्निर्मिती अपुरी पडेना. माझ्यासारख्या झाडांनाही रोजगार असतो, आपल्या रोपट्यांची जाळी भिरभिरणं पहात नाही. त्यांना समूहजीवनात व्यत्यय येतो. या समूहांना धरून असणारे कीटक, पक्षी, प्राणीही मग देशोधडीला लागतात. जंगल उजाड झाली पण तर, हिरवं दिसलं तरी आतून आयं पोखरलं जातं. हजारो वर्षांपासून माणूस आज माझ्या नावाचा रहात आहे. आणि जंगलाचा ऱ्हास जुना, त्याच्या पोखरल्या जात चालल्याचं मला जाणवतंय. माझ्या जीवनरस आटत चाललाय. प्रत्येक दिवशी कोरडी पडतीय. कस्तांना पाणी शोषतायं. माझी बेकुळकी कारिका – मिसा मातीतून पुरेसं पाणी मिळत नाहीये. मिळालं तरी ते निघून जातंय. त्याही कोरडेपणा जाणवतोय. इतर कळ, रिमार्जनी झाडझाडोरा नष्ट होताय. तिने

पृथ्वीचा ~~?~~ पाणी इतकं पृथ्वीवरची निसर्गाचं गाव उद्ध्वस्त होतंय. आम्ही या त्यांच्या जीवनरस शोषून घेऊन यातून निर्माण काय करतोय तर सांडपाणी, दुर्गंधी आणि विखार.

पण कितीतरी उत्पादनं-मानवाचे आम्ही सर्व हे सारं सहन करतोय. हे सर्व घडून आपल्यात पृथ्वीदेवीला कधीतरी हे असह्य होणार असं आम्हा सर्वांनाच वाटतंय. त्यानंतर यातूनही प्रचंड, भयानक उत्पातांना आम्ही तोंड देतोय. याच्यातूनही प्रचंड पर्वतांना पृथ्वीमातेनं जन्म दिला तेव्हा केवढं उत्पात झाले, आगीचे लोळ, भूगर्भातल्या लाटांनी सृष्टी झाकून गेली जणू अंतकाळ. कितीतरी वनस्पती, प्राणी त्यावेळी भुईसपाट झाले. जरा नवीन पर्वतांना पृथ्वीदेवीनं जन्माला घातलं, तसंच नवी वनस्पती, प्राणीसृष्टीही तिला भुलवायची वाटली. जरा केव्हा ऋतूंना भास व्हायचा, नवीनांना स्वागत असतं. पृथ्वीदेवीला नियमन आहे नसं. मानून मानवाला विकल्याच हातीला घालून नवीन गोल जन्माला घालायचे, त्यानंतर पृथ्वीदेवीच्या मनात नसेल. म्हणूनच ही मानवं जेव्हा कल्पना करतात की आजच्या पृथ्वीची सरसंगोपी करायचं सामर्थ्य त्यांच्या हातात आहे, तेव्हा मला त्यांची कीव करावीशी वाटते. त्यांच्या या आत्मविश्वासाला विटेनुसार संहारक असं सृष्टीचे अपूर्व घडवली आहेत. त्यांच्यापैकी उद्यानांना जोखमीचं आहे, नवे गोल घडविले आहेत. मानवा, तुझ्या बुद्धीनं तुला फार थोड्या काळात उत्तम मनविलं. तुझं राज्य सौरमालेपर्यंत पसरणार का? तुझ्यापेक्षा बुद्धीनं तोकड्या पण हातीनं दमदार प्राण्यांनी एक-काळी पृथ्वीवर केवढं दीर्घ साम्राज्य भोगलं होतं. प्रतिभेच्या मुळाशी असणारी बुद्धी तुझी बुद्धीच तुला आपल्या वैरीन घेऊन देणार का?

हे विचार जेव्हा माझ्या मनात येतात, तेव्हा काही मानवांच्या मनातही येत असतील. त्यांना मी आधुनिक मानवं म्हणतो त्यांच्यासाठी. ते इथं येतात, सारं निरखतात, सृष्टीचं मन ओळखून तेवढ्याने इथं राहणाऱ्या मानवांना हलकेच त्यांची मनं दाखवतात. मग ते पुढे पाणी आडवू पाहतात, झाडं वाढू पाहतात. मानवातलं अंतरंग त्यांना कळतं, पण सृष्टीचं कळत नाही, असं मला म्हणावंसं वाटतं. पण काही थोडेच असेही असतात की त्यांना दगडमातीचं ही अंतरंग कळू शकतं. ते दगड अन् दगड, मातीचा कण न् कण ओळखू पाहतात, त्यांच्या भोवती फिरतात, तो कुरवाळू पाहतात. निसर्गाचं मन त्यांना कळतं, मातीशी ते आपलेपण करतात, निसर्गाचं मन जिंकतात, मग मग, हळूहळू त्यांच्याकडे आपोआप जातात आणि पृथ्वीदेवी प्रकृतीला प्रसाद देते. तो ज्या कुणाचाही असो जादू करत जातो, हे त्यांचं विचार.

मानवाच्या तोकड्या बुद्धीची मजल सामान्यांकडे बघून लक्षात येत नाही. ही काही आधुनिक मानवांना त्यांच्याकडे पाहिलं होतंय, असं मला वाटतं. पृथ्वीच्या ~~?~~ हृदयाशी या प्रयोगातून तेल काढायचं असेल. मातीतून महामानव निर्माण करण्याचं स्वप्न असेल तिचं. तसं असेल तर हा प्रयोग विज्ञानाला म्हणायला अद्वितीय महामानवा.

माझे हे विचारतरंग माझ्यापुरते मर्यादित नाहीत ना? निसर्गाचे कोरडे गोंगाट एका विचारधारेने त्यांच्याशी जोडले गेले आहेत. माझी खात्री आहे, सारं अंतराळ, सारं विश्व या प्रयोगाकडे डोळे लावून बसलंय!

# हाक परतते



हाक परतते
याच्याहून मोठे
दुःख काय असे?

दुःख जणू काही
उर्मिलेचा जन्म
एकांताचे मर्म!

हेलावे एकांत
तळाशी भिऊन
कासावीस मन!

मनापाशी जुना
भरतीचा क्षण
तुझी आठवण!

❍ **अरुणा ढेरे**



# ही युगायुगांची कथा

तो खेळ रंगला
त्या यमुनेच्या काठी!
साक्षीस चांदवा
धुंद कदंबापाठी!

त्या जलभरणाला
गोप बालिका जमल्या!
विसरून जगाला
रासामध्ये रमल्या!

स्पर्शात सख्याच्या
गहिवरली विरघळली...
अन् बनली राधा
कृष्णसख्याची मुरली!

जनरीत विसरूनी
स्वप्नी गौळण दंग -
चित्तास लागला
ध्यास एक श्रीरंग!

ही युगायुगांची कथा
फिरूनही घडली -
हृदयात कृणाच्या
तीच राधिका दडली!

हरपले भान ही
त्या वेणूची बाधा -
बदनाम तरी का
पुन्हा गोकुळी राधा!

का जिवास पडली
तीच अनामिक भूल -
मग मनी उमलते
तेच विखारी फूल!

ही तुझीच ना रे
सप्तसुरांची शीळ?
अन् तूही तोच ना
चित्तचोर घननीळ!

❍ **नीलांबरी कुलकर्णी**


# पालवी

आभाळात पूर्ण चंद्राचा भास झाला तिला
आणि चंद्रहास हासला मनात
सुरू झाली रक्तामधली भरती-ओहोटी आवेगाने
जीव लागेना कशात
रात्रंदिवस मूकपणे रडत राहिली ती

तडफडत असायचं मन सतत
राग उफाळून यायचा जगावरचा
क[illegible]त शांतावून मन अपुऱ्या भासांमधून
पुन्हा नव्यानं तडफडू लागायचं,
कुरवाळायची, फुंकर घालायची, समजवायची
नवेनवे अन्वयार्थ लावत
रडव्या मुलासारखं पुन्हा उसासत राहायचं ते

मग मोठ्ठा पट मांडला तिनं आयुष्याचा
नव्यानं मांडले त्यात सूर्य-चंद्र-तारे
चंद्र विझवला जबरदस्तीनं,
ताऱ्यांना हद्दपार केलं.
आता ढळढळीत सूर्यप्रकाशात
पालवी फुटण्याची वाट पाहात राहिलीय ती.

❍ **उषा मेहता**



# मी एक डोंगर...


प्रकाश गोळे



"**मी** एक डोंगर पाषाणमृत्तिकेचा" हे तर खरंच आहे. पण हे पूर्ण सत्य आहे का? असं मला त्या माणसांना विचारावंसं वाटतं. सचेतन व अचेतन अशी त्यांनी सृष्टीची विभागणी करून टाकली आहे. पण साऱ्या जगाचा जन्म झाला एका प्रकाशाच्या ठिणगीतून. त्याच ठिणगीची धगधग या माणसांच्या हृदयातून अजून ऐकू येतेय. म्हणून त्यांना सजीव म्हणायचं. वृक्ष, पक्षी, प्राणी एवढंच नव्हे तर छोटासा कीटक घेतला तरी त्याच्याही हृदयात ही ठिणगी मशलती आहेच. म्हणून यांना सजीव म्हणायचं. पण मला, माझ्याभोवतालची दऱ्याखोरी, माझ्या सर्वांगावरून ओघळणारं पाणी आणि माझ्याभो

रूंजी घालणारा वारा, यांना निर्जीव, अचेतन सृष्टीचं रुप म्हणायचं. अशी आहे या माणसांनी केलेली विभागणी. मला मात्र हे ऐकलं, पाहिलं की हसू येतं. कीवही करावीशी वाटते या क्षुद्र जीवांची! अर्थात् त्यांच्यातही काही शहाणे आहेत, जे म्हणतात की आमच्या ज्ञानाची कक्षा अजून इथपर्यंतच विस्तारलेली आहे. न जाणो! उद्या ज्ञानमंजुषेची कवाडे आणखी उघडतील आणि आम्हाला नवी दृष्टी मिळेल. आमच्या भोवतीचा अंधकार दूर होईल. असे शहाणे लोक या माणसांत आहेत म्हणून थोडी तरी त्यांची कदर करायची. नाहीतर या क्षुद्र जीवांच्या वल्गना ऐकायच्या, करमणूक करून घ्यायची आणि वाऱ्याच्या फुंकरीनं उडवून लावायच्या.

खरंतर आमच्या प्रपंचात या माणसांचा विचारही करण्याची वेळ येऊ नये. लाखो वर्षे कुठे होती यांची वर्दळ आमच्याभोवती? तो जुना काळ आठवला, लहानपणींचे दिवस आठवले की अजूनही मन भरून येत. असं सांगतात की माझ्या जन्माच्या वेळी पृथ्वीच्या गर्भाशयातून प्रकाशाचे लोळ उठले, ठिणग्यांच्या झगमगत्या पडद्याने वातावरण पेटले, पृथ्वीच्या पोटातून उष्णतेचे कढ बाहेर पडले आणि मी सावकाश, अंगुळाअंगुळाने वर उचलला गेलो, क्षताक्षताने, रंध्रारंध्राने बाहेर उघड्यावर आलो. फार काळपर्यंत पृथ्वीमातेला प्रसूतीच्या वेदना सहन कराव्या लागल्या. गर्भाशयातील दाहक उष्णता घेऊनच मी बाहेर पडलो. अंग कढत होते, वेदनांनी भूमी थरथरत होती, अग्नीचे झोत आकाश प्रकाशमान करीत होते. ठिणग्यांचा पाऊस पडत होता, आणि कानठळ्या बसविणाऱ्या आवाजाने वातावरण झणाणत होते.



बाहेरच्या वातावरणाचा स्पर्श झाला तशी अंगाची दाहकता कमी होऊ लागली. एकेक ठिणगी विझू लागली. भूमीची गदगद विरू लागली. पृथ्वीच्या पोटातली धडधड, कडकड शांत होऊ लागली. तसे आवाजाने पेटलेले वातावरण निवू लागले. घणाघाती निनाद थांबले तरी त्या शब्दाचा हुंकार वातावरणात कित्येक दिवस भरून राहिलेला मला अजूनही आठवतो. माझ्या एकेक संवेदना हळूहळू जागृत होत होत्या.

मला पहिली आठवण आहे ती दृष्टी कोंदून टाकणाऱ्या धुक्याची. उष्णतेच्या कढाचे रुपांतर जणू नजर घुसमटणाऱ्या, अजूनही गरम लागणाऱ्या वाफेत झाले होते आणि ते उसासे सारे आसमंत व्यापून राहिले होते. मला क्षणभर शुद्ध येई आणि मी पुन्हा गुंगीत जाई. एक उशाशातूनच मला ओला स्पर्श केव्हातरी जाणवला. त्या ओल्या स्पर्शाने क्षणभर जाग आली पण पुन्हा गुंगीने झपाटले. नंतर पुन्हा जाग आली त्यावेळी आपले सारे अंग ओलेचिंब झाले आहे, अशी जाणीव झाली. उष्णजलाच्या मऊ घड्या अंगावर सतत कोणीतरी ठेवीत होते. अंगाचा दाह कमी होत होता, तसा जलाचा थंड, चैतन्यमय स्पर्श जाणवत होता. मला पूर्ण शुद्ध आली तेव्हा जाणवलं की त्या सुखकर पाण्यात आपली अंघोळ चालू आहे. आकाशातून येणारा थेंब न् थेंब माझ्या शरीरातले अणुरेणू सुखवीत होता ती नुसतीच आंघोळ नव्हती, शरीर चेतविणारी, कुंडलिनी जागृत करणारी क्रिया होती. ती जीवनगंगा रंध्रारंध्रातून माझ्या शरीरात खोल शिरत होती आणि माझी एकेक धमनी त्या जीवनरसाने चैतन्यमय होत होती. या रुधिराभिसरणाने माझा एकेक अवयव जागा होत होता, रसरसत होता आणि जन्मकाळाच्या वेळी अंगावर चढलेली पुटे एकेक धुतली जाऊन शरीराला आकारा, डौल प्राप्त होत होता. अजूनही अधूनमधून माझी शुद्ध हरपे, गुंगी येई आणि असा किती काळ गुंगीत जाई कोण जाणे! जाग आली तरी जाणवे, ते आकाशातून टपटपणाऱ्या थेंबांचे मन्द्र संगीत. त्याच्या जादुमयी नादात पुन्हा मन तंद्रीत जाई, शुद्ध हरपे. असे कितीदा तरी झाले असेल. पण हळूहळू शरीरातला आळस निघून जातोय, अंगाच्या एकेक टोकापासून हृदयापर्यंत शरीर प्रकाशमान होते आहे, डोळ्यांवरची झापड कमी होऊन नजर आपोआप जास्त काळ अवकाशात भिरभिरतीय असं वाटत होतं खरं! आणि अचानक एक दिवस पूर्ण शुद्ध आली. पहिली जाणीव झाली, कोरडेपणाची. आकाशातून टपकणारे थेंब पूर्णपणे थांबले असावेत, मला ऊब आणणारी धुक्याची दुलईही आता नाहीशी झाली होती. प्रथमच मी माझ्या शरीरावरून नजर फिरविली. माझ्या शरीराचा काही भाग कोरडा पडला होता. काही अजूनही ओला होता. सृष्टीदेवीने हिरव्या मखमली आवरणाने माझी लाज राखली होती. माझ्या आसपास दऱ्या पहुडल्या होत्या. माझ्या थबथबणाऱ्या बाजूतून स्त्रवणाऱ्या पाण्याचा त्यांना सतत अभिषेक होत होता. या जलभरांनी अजूनही त्या गुंगीतच होत्या. त्यांच्या शरीरावरून ओघळणारे प्रवाह पलिकडच्या मैदानात एकत्र होऊन

त्यांची बनलेली सरिता वळणावळणाने वाहत होती. त्या सरितेने जेव्हा मला वाकून नमस्कार केला, तेव्हा जाणवलं की आपलं पहिलं अपत्य जन्माला आलंय.

सृष्टीदेवी ही आम्हा सर्वांची माता ही जाणीवही याचवेळी मला झाली. ती विश्वरुप होती, जगतजननी होती. तिच्यापासून निघालेल्या लहरी आणि कंपने आमच्यापर्यंत पोहोचत. त्यातून निरनिराळे संदेश मिळत. ती जेव्हा बोले, तेव्हा अवकाश थरारे आणि आसमंत विद्युल्लतेने भारला जाइ. सूर्यकिरणांशी आमची नाळ जुळली तिच्यामुळेच. अंग करपविणारा त्यांचा दाह तिनेच कमी केला आणि स्पर्श होताच भस्म करणारी त्यांची शक्ती सौम्य केली. अंतराळातील चितशक्तीचा परिचय तिनेच करून दिला आणि दूरदूरच्या खगोलांचे गुंजन आमच्यापर्यंत पोहोचले तिच्यामुळेच.

नियमितपणे निळसर-राखी ढगांच्या पडद्याआड सृष्टीदेवी आम्हाला आंघोळ घाली. नवे कपडे नेसवी. माझी मखमली बाळलेणी उतरवून तिने मला नवनवीन वेष दिले. चित्रविचित्र वनस्पतींनी त्यावर नक्षी काढली, विविध प्राणी-पक्ष्यांनी तीत रंग भरले. मलाच नव्हे तर भोवतीच्या दऱ्याखोऱ्यांनाही तिने किती प्रकारच्या आभरणांनी नटविले, सरितेला नृत्यगायनादी कला शिकविल्या. दिवसेंदिवस आमचं कुटुंब विस्तारत होतं. इवल्याशा तृणांकुरापासून आभाळ व्यापणारे वृक्ष माझ्या डोळ्यांसमोर तयार झाले होते. सूक्ष्म कीटकांपासून विक्राळ प्राण्यापर्यंत असंख्य जीव माझ्या डोळ्यांदेखत वाढले होते. जुने नाहिसे होत होते, नवीन जन्माला येत होते. तरी सर्व सृष्टीदेवीच्याच कह्यात होते. अंतराळात भिरभिरणाऱ्या निरनिराळ्या शक्ती, किरण, आवर्तने यांना पकडून धुलिकणांपासून अफाट जीवसृष्टी निर्माण करण्याचे तिचे सामर्थ्य इतके अलौकिक होते की आम्ही सर्व तिच्यापुढे नतमस्तक होतो.

पण नंतर अशी एक घटना घडली की प्रथमच सृष्टीच्या सामर्थ्याविषयी शंकेची पाल मनात चुकचुकली. त्यावेळी सृष्टीदेवी गाफील होती म्हणायचं की बुद्ध्याच तिने एका नवीन प्रयोगाला सुरुवात केली असं म्हणायचं, याचा उलगडा मला अजून होत नाहीये. कोणत्या तरी क्षणी तिने असा जीव जन्माला घातला की जो सर्वांना पुरून उरेल, सर्वांवर मात करील, सर्व काही खायला उठेल. प्रथम त्याचं अस्तित्त्व आम्हा कोणाच्याच लक्षात आलं नाही. किरकोळ शरीराचा हा प्राणी लपून राही. सर्वांना घाबरे आणि उंच झाडांच्या पर्णराशीत स्वतःला दडवून ठेवी. हळूहळू मात्र त्याचं अस्तित्त्व लक्षात येऊ लागलं. सृष्टीदेवीनं त्याचं शरीर किरकोळ ठेवलं खरं, पण त्या मेंदूला बुद्धीचं अमोघ शस्त्र प्रदान केलं. कशासाठी? हे मला अजून उमगलेलं नाही. एक जालीम विध्वंसक शक्ती तिने विश्वात सोडून दिली खरी! तेव्हापासून आमची आयुष्यं पालटली, जीवनाला नवी वळणे मिळाली, नव्या चिंता, नवे क्लेश निर्माण झाले. सतत वळवळणाऱ्या, किरकोळ शरीराच्या या जीवांनी लवकरच सारी पृथ्वी व्यापली, बुद्धीच्या जोरावर साऱ्या प्राण्यांना, वनस्पतींना पायींचे दास केले आणि प्रत्यक्ष सृष्टीदेवीवर मात करण्याच्या त्यांच्या सतत चाललेल्या वल्गनांनी डोके भणाणून गेले. ही विध्वंसक शक्ती कोण हे लक्षात आलं असेलच एव्हाना. तिचे नाव माणूस!

असा अचाट शक्तीचा, बुद्धीचा प्रतिस्पर्धी सृष्टीदेवीने कशासाठी निर्माण केला? तिला "थ्रिल"- साहसाचा आनंद हवा होता म्हणून? आपणांस आव्हान देणारी शक्ती विश्वात असावी, असं तिला वाटलं म्हणून? मी जेव्हा जेव्हा या विषयाचा विचार करतो, तेव्हा मति गुंग होऊन जाते.

लवकरच मलाही जाणीव होऊ लागली की ही विध्वंसक शक्ती आपल्यावर आक्रमण करीत आहे, आपले अंग पोखरीत आहे. माणसाच्या अस्तित्त्वाची मला जाणीव झाली, जेव्हा माझ्या गुहांतून त्याने रहायला सुरुवात केली. तेव्हा आम्हा सर्वांना भयप्रद वाटणाऱ्या अग्नीला त्यानं कसं कोण जाणे, वश करून घेतलं. त्यानं त्याचा प्रकाश सतत तेवत ठेवला. स्वतःभोवतीचा अंधकार दूर केला, मेलेल्या प्राण्याचं मांस आणि कंदमुळं ह्यावर भाजायला तो शिकला. एवढंच नव्हे तर त्याला भयानक वाटणाऱ्या जंगलाला तो आगी लावीत सुटला. आभाळाला भिडणारे कितीतरी वृक्ष या आगीत धडाधड कोसळताना मला दिसू लागले. असं जंगल जळालं की तिथं मोकळं रान तयार होई. इथं उघड्यावर किडुकमिडुक सापडलं की ही माणसं त्याला धरून मारीत. जंगलातल्या प्राण्यांना काहीवेळा हा मोकळा भाग ओलांडावा लागे. तिथं ही माणसं दबा धरून बसत आणि प्राण्यांना घेरून मारीत किंवा हाकलीत कड्याच्या टोकाशी नेत आणि खाली उडी घ्यायला लावून त्यांचा चेंदामेंदा करीत. या आगीत मोठाले पतंग, चतुर असे कित्येक कीटक जळून मरत. प्रचंड आकाराचे हे उडते, झगमगते कीटक म्हणजे माझं वैभव होतं. त्यांच्या पंखांवर सूर्यप्रकाश पडला की सप्तरंग झळाळत. हे माझे अलंकार माणसांनं हिरावून नेले. हे कीटक कित्येक वनस्पतींचा जीव की प्राण होता. त्यांची बीजे वाहून नेण्याचं, पराग पोचविण्याचं काम ते करीत. झाडांना फुलं, फळं आली की सुंदर पक्षी त्यावर तुटून पडत. त्यांच्याद्वारे केसर आणि बी इथे-तिथे पोहोचविलं जाई. हे कीटक गेले, पक्षी गेले, तसा वृक्षवेलींचाही वंशच्छेद होऊ लागला. जमिनीत बिळं करून राहणारे, माती पोखरून राहणारे प्राणीही उघड्यावर आले. पाण्याबरोबर त्यांची घरं वाहून गेली. वृक्ष-वनस्पतींनी तयार केलेली माती धुवून गेली आणि तेवढ्या भागावर उन्हाचे चटके मला बसू लागले. थंडीनं शरीर आक्रसू लागलं.

आग लावून, जंगल जाळून एखादा भाग साफ केला की माणूस तिथली कंदमुळं, प्राणी, पक्षी, संपेतोपर्यंत तिथं राही आणि मग चालता होई, दुसरीकडे आग लावायला. मग त्या भागावर प्रथम थोडे गवत उगवे, तणं, झुडुपं मूळ धरीत आणि काही काळानं झुडुपी जंगल माझा तेवढा भाग झाकून टाकी. पण कुठे ते राजशाही, भव्य वृक्षांनी नटलेलं जंगल आणि कुठं ही खुरटलेली, खुजी राई. हे खुरटं जंगल जाळायलाही माणूस येतो की काय, अशी मला सतत धास्ती वाटे. पण बहुधा तो इकडे फिरकत नसे. त्याच्या इन मिन साडेतीन हातांच्या मानानं जंगलं अफाट होती. सगळी जाळायला माणसाला अनेक जन्म घ्यावे लागले असते.

एकदा असं झालं, माणूस एका जंगलाचा तुकडा जाळून जो निघून गेला, तो पुन्हा तिकडे फिरकलाच नाही. कितीतरी काळ लोटला, खुरट्या जंगलाचं छातीएवढ्या जंगलात आणि नंतर चांगल्या झाडीत रुपांतर झालं. त्यातून काही वृक्ष सरासरा वाढत आभाळाला भेटायला निघाले. मला पुन्हा जुन्या, डेरेदार वृक्षांची स्वप्नं पडू लागली. वाटलं, माणसांची बला आता कायमची टळली. सृष्टीदेवीनंच त्याच्या लीलांना आवर घातलंय असं वाटू लागलं.

पण नाही! एक दिवस माणसांची एक मोठी टोळीच चाल करून आली. आता त्यांच्याजवळ धारदार, लखलखीत शस्त्रं होती. त्यांचे घाव घालून त्यांनी वृक्षतोड सुरू केली. मुळापासून वृक्ष उखडले गेले. आगीपेक्षाही ही कत्तल भयानक होती. वृक्ष उन्मळून पडले. मग या विध्वंसकांनी त्यांच्यावर आगीचाही प्रयोग केला. हळूहळू साऱ्यांची

राख झाली. आनंदी झालेले हे विध्वंसक तिथेच थांबले. जंगलातनं आणखी झाडे तोडून आणून त्यांची लाकडं उभी करून त्यांनी त्यांचं घर बांधलं आणि आपल्याबरोबर आणलेली विचित्र जनावरं त्यात बांधली. दररोज सकाळी ही जनावरं जंगलात घुसू लागली, झाडं-झुडुपं ओरबाडू लागली, मोकळ्या भागात उगविलेल्या गवतावर तर त्यांनी विलक्षण हात मारला. मला अचंबा वाटला. एका जागी स्थिर राहणारा माणूस मी प्रथमच पहात होतो. जसजसा काळ उलटला, तसतसं मला जाणवलं की माणूस हा आता इथंच राहणार, हे जंगल, हा डोंगर माझाच म्हणणार, सृष्टीनं मला दिलेल्या साऱ्या धनाचा उपयोग स्वतःसाठी करू पाहणार, इतर कोणालाही त्यात वाटेकरी होऊ देणार नाही. इतरांच्या अस्तित्त्वावरच घाला घालण्यात सृष्टीदेवीचा हेतू तरी कोणता होता? मला उमगेना. पण देवीची ही करणी निमूटपणे पहात बसणे, सहन करणे, याशिवाय माझ्या हातात काय होते?

माणसं स्थिरावली. त्यांची जनावरं जंगलातल्या प्राण्यांच्या तोंडचा घास काढून नेऊ लागली आणि [illegible]स भर म्हणून माणसानं रानगवतापासून तयार केलेलं बी पेरून शेती करायला सुरुवात केली. त्यासाठी आणखी जंगल कापून, जाळून जमीन मोकळी केली गेली. माणसाची जगण्याची धडपड मी समजू शकत होतो. पण आपल्या बुद्धीचा उपयोग तो माझी संपत्ती निव्वळ ओरबाडण्यासाठी करील, असं मला वाटलं नव्हतं. ती राखण्यासाठी, वाढविण्यासाठीही तो काहीतरी करील, अशी आशा मी बाळगून होतो. ते तर खरं त्याच्याच हिताचं होतं. नाही म्हणायला काही ठिकाणी जंगलांचे तुकडे त्याने राखून ठेवले, त्यातले झरे त्यामुळे बचावले. सरितेला तेवढंच बारमाही पाणी मिळालं.

जशी माणसं माझ्या आश्रयानं कायमची राहू लागली, तसे त्यांच्या अस्तित्त्वाचे परिणाम आम्हा सर्वांना जाणवू लागले - मला, माझ्या वनस्पती-प्राणी-पक्षी-कीटक मित्रांना. तसं म्हटलं तर माणूस मोठा हावरट नव्हता. स्वतः जगायचीच तो धडपड करीत होता. पण त्याची दृष्टी वर्तमानपर्यंतच मर्यादीत होती. भविष्यात दूरवर पहायची त्याला जरूर वाटत नव्हती. त्याच्या मते सृष्टीचं धन अपरंपार होतं. त्याला ते राखण्यासाठी, वाढविण्यासाठी श्रम करायची जरूर नव्हती. त्यानं जनावरांसाठी, शेतीसाठी जंगल साफ केलेल्या जमिनीवरची माती वाहून जाऊ लागली तरी त्याला पर्वा नव्हती. अशा जमिनीवर काही काळ उत्तम गवत उगविलं, त्यात निरनिराळ्या कीटकांनी वस्ती केली. जमीन भुसभुशीत ठेवली. अरण्यात जाऊन वनस्पतींच्या परागवहनास हातभार लावला. कीटकांवर पक्षीजीवन फुललं, त्याचाही वनस्पतींना फायदा झाला. पण गवतावर जनावरं चरू लागली. त्यांची संख्या सतत वाढत गेली. उत्तम प्रतीच्या गवतावर त्यांनी आधी ताव मारला. फुलांवर येण्याआधीच ते कुरतडलं गेलं. त्याला बी धरलंच नाही, वाऱ्यानं पसरलं नाही. दर पावसाळ्यात व नंतर ही क्रिया चालू राहिली. उत्तम गवताची पैदास कमी कमी होत गेली. त्याची जागा काटेरी, निकृष्ट गवताने घेतली. उत्तम गवत गेलं, तसे त्यावरचे कीटक गेले. त्यापाठोपाठ पक्षी गेले. परागवहन, बीजवहन थांबत गेलं. आता कित्येक वनस्पती पावसाळ्यात व नंतर फुलेनात, फळेनात. काही झाडं एका पावसाळ्याआड फळू लागली. काही तीन-तीन, चार-चार पावसाळ्यानंतर पुष्पफळांनी बहरलो. गुरांची अनिर्बंध चराई चालूच राहिली. त्याबरोबर निकृष्ट गवतही संपू लागली. त्यांची जागा तणांनी घेतली. दर पावसाळ्यात असंख्य रंगीबेरंगी फुलांचे गालिचे पसरलेले डोंगरमाळ पाहून माणसं भुलली, पण काही मोजकेच कीटक त्यांच्याकडे आकर्षिले गेले. टोळ, भुंगे असे. अनेक प्रकारच्या



कीटकांनी मात्र तिकडे तोंडही फिरविले नाही. कीटक-पक्ष्यांविना वनस्पतीही उदास झाल्या.

जगण्यासाठी माणूस जंगलावर केवढा तरी अवलंबून होता. त्याला सरपण लागे, शेतीसाठी, घरासाठी लाकूड लागे, कंदमुळे, फळे, फुले, मुळ्या औषधासाठी लागत. जंगलतोडीमुळे मोठी झालेली, जोमदार झाडं हळूहळू कमी होऊ लागली. पावसाळ्यात होणारे पुनरुज्जीवन आता पुरे पडेना. माणसासारखा झाडांनाही शेजारधर्म असतो. आपल्या शेजाऱ्याची झालेली कत्तल कित्येकांना पहावत नाही. त्यांच्या समूहजीवनात व्यत्यय येतो. या समूहांना धरून असलेले कीटक, पक्षी, प्राणीही मग देशोधडीला लागतात. जंगल दुरून जरी घनदाट, हिरवं दिसलं तरी आतून असं पोखरलं जातं. हजारो पावसाळे माणूस माझ्या आश्रयाने रहात आहे आणि जंगलाचा एकेक तुकडा असा पोखरला जात आहे. माझा जीवनरस त्यामुळे आटतोय. एकेक धमनी कोरडी पडतीय. झऱ्यांचं पाणी संपलंय. माझी लेकुरवाळी सरिता-तिला माझ्याकडून पुरेसं पाणी पोहोचविलं जात नाहीये. मिळालं तरी ते झपाट्याने निघून जाताय. झाडं, आमची नैसर्गिक धरणं, नष्ट झाली आहेत. त्यामुळे तिलाही कोरडेपणा जाणवतोय. तिचे काठ, काठचा झाडोरा, नष्ट झालाय. तिने भूमीला दूरदूर पाणी पुरविण्यासाठी विणलेलं जाळं उध्वस्त होतंय. आम्हा साऱ्यांचा जीवनरस शोषून घेऊन माणूस निर्माण काय करतोय तर सांडपाणी, दुर्गंधी आणि विखार.

गेले कित्येक उन्हाळे-पावसाळे आम्ही सर्व हे सारं सहन करतोय. हे सर्व घडवून आणण्यात सृष्टीदेवीचा काहीतरी हेतू असणार असं आम्हा सर्वांना वाटतंय. खरंतर याहूनही प्रचंड, अफाट उत्पातांना आम्ही तोंड दिलंय. माझ्याहूनही प्रचंड पर्वतांना पृथ्वीमातेनं जन्म दिला, तेव्हा केवढे उत्पात झाले, आगीच्या लोळांनी, धुळीच्या लोटांनी सूर्य जणू अनंतकाळ झाकून गेला. कित्येक वनस्पती, प्राणी त्यावेळी मृत्यूमुखी पडले. जसं नवीन पर्वतांना सृष्टीदेवीनं जन्माला घातलं, तशी नवी वनस्पती-प्राणीसृष्टीही तिला फुलवावीशी वाटली. अशावेळी जुन्यांना थारा नसतो, नव्यांचंच स्वागत असतं. सृष्टीदेवीचा नियमच आहे तसा. माणूस नावाच्या विध्वंसक शक्तीच्याद्वारे नवीन जीव जन्माला घालायचे, असा तर सृष्टीदेवीचा बेत नसेल? म्हणूनच ही माणसं जेव्हा वल्गना करतात की साऱ्या पृथ्वीची राखरांगोळी करण्याचं सामर्थ्य त्यांच्या अस्त्रांत आहे, तेव्हा मला त्यांची कीव करावीशी वाटते. त्यांच्या साऱ्या अस्त्रांच्या कित्येकपट संहारक अस्त्रं सृष्टीदेवीने यापूर्वी पाजळलेली आहेत. त्यांच्याकरवी उद्दामांना लोळविलं आहे. नवे जीव फुलविले आहेत. मानवा, तुझ्या बुद्धीनं तुला फार थोड्या काळात उद्दाम बनविलं. तुझं राज्य मात्र औटघटकेचंच ठरणार का? तुझ्यापेक्षा बुद्धीनं तोकड्या पण शक्तीनं वरचढ प्राण्यांनी एकेकाळी पृथ्वीवर केवढी दीर्घ साम्राज्ये भोगली होती. प्रतिभेच्या भराऱ्या मारणारी तुझी बुद्धीच तुला काळाच्या गर्तेत लोटून देणार का?

हे विचार जसे माझ्या मनात येतात, तसे काही माणसांच्या मनातही येत असावेत. त्यांना मी शहाणी माणसं म्हटलं ते एवढ्याच[illegible] ते इथं येतात, सारं निरखतात, सृष्टीचं धन ओरबाडून नेल्याने इथं राहणाऱ्या माणसांच्या हलाखीनं त्यांची मनं हेलावतात. मग ते कुठं पाणी अडवू पाहतात, झाडं लावू पाहतात. माणसाचं अंतरंग त्यांना कळतं, पण सृष्टीचं कळत नाही, असं मला म्हणावंसं वाटतं. पण काही थोडीफार अशीही असतात की ज्यांना दगडमातीचंही अंतरंग कळू शकतं, ते दगड अन् दगड, मातीचा कण न् कण जोखू पाहतात, त्याच्या पोटात शिरतात, तो फुलवू पाहतात. निर्झराचं मन त्यांनाच कळतं. मातीला ते आपलंसं करतात, निर्झराचं मन जिंकतात, मग गवत, तृणांकूर त्यांच्याकडे आकर्षिले जातात. त्यांच्या विशाल दृष्टीच्या टप्प्यात डोंगरमाथ्यापासून सागरापर्यंतचा निसर्ग सहज मावू शकतो. त्यातील अंतःसंबंध, गुंतलेले धागे आणि जीवनसाखळ्या यांची उलगड तेच करू शकतात. सृष्टीदेवीलाही प्रसन्न करून घेण्याचं सामर्थ्य त्यांच्यात आहे. सृष्टीदेवीचा एक ओझरता कटाक्ष जरी त्यांच्या वाट्याला आला, तरी तो पुरेसा असतो. तो एक कटाक्षही केवढी जादू करून जातो, हे त्यांनाच विचारा!

मानवाच्या तोकड्या बुद्धीची मजल स्वार्थापलिकडे अजून पोहोचलेली दिसत नाही. ही काही शहाणी माणसंच त्यापलिकडे पोहोचू शकतील असं मला वाटतं. कदाचित सृष्टीदेवीला या प्रयो[illegible] हेच साधायचं असेल. मानवातून महामानव निर्माण करण्याचं स्वप्न असेल तिचं. विध्वंसाच्या राखरांगोळीतून सौंदर्याचा ताजमहल उभा करायचा असेल तिला. स्वार्थबुद्धीने विध्वंसात गुंग झालेल्या माणसाला सृष्टीचा हेतू, तिचे अंतरंग कोठून मिळणार? आमच्यासारख्या सृष्टीच्या पाईकांनाच ते कळणार. मला वाटतं, तसाच जर सृष्टीदेवाचा हेतू असेल तर हा प्रयोग विलक्षणच म्हणायचा, अद्वितीय म्हणायचा.

माझे हे विचारतरंग माझ्यापुरते मर्यादीत नाहीत बरं का! विश्वातले सारेच गोलक एका विचारधारेने एकमेकांशी जोडले गेले आहेत. माझी खात्री आहे. सारं अंतराळ, सारं विश्व या प्रयोगाकडे डोळे लावून बसलंय.

❑❑❑

**प्रकाश गोळे.**
१/ब, अभिमानश्री सोसायटी,
पाषाण रस्ता, पुणे - ४११ ००८.

"चंद्रकांत"च्या असंख्य वाचकांस
दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!!!

# शब्दा सिस्टीम्स

डी. टी. पी.
कॉम्प्युटर हार्डवेअर, मेन्टेनन्स
आणि
सॉफ्टवेअर ट्रेनिंग

★☆★☆

महाराजा बिल्डिंग, पहिला मजला, पोर्तुगिज चर्चसमोर,
गिरगाव, मुंबई - ४०० ००४. टेलि.: ३८२ ३५ ४८.

विशेष :
ह्या "चंद्रकांत" दिवाळी विशेषांकाची अक्षर जुळणी
आणि आतील सजावट आम्हीच केली आहे.